मुंबई वित्तीय नियम 1959 अंतर्गत वन विभागातील अधिका-यांना विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :एमएससी-2011/प्र.क्र.177/फ-5,
मंत्रालय, मुंबई -400 032,
दिनांक 11, ऑगस्ट, 2011.

वाचा : 1. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एमएससी-1091/2663/प्र.क्र.73/फ-5, दिनांक 20/12/1991.
2. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एमएससी-1091/2663/प्र.क्र.73/फ-5, दिनांक 29/12/1992.
3. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एफडीसी-2004/प्र.क्र.22/फ-5, दिनांक 17/02/2004.

प्रस्तावना :

संदर्भीय शासन निर्णयान्वये वन विभागातील वनसंरक्षक व सह संचालक यांना विभाग प्रमुख, उपवनसंरक्षक व उप संचालक (सामाजिक वनिकरण विभाग) यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख व वनक्षेत्रपाल यांना कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्यांत आलेले आहे. वन विभागात विविध पदांची श्रेणीवाढ झाल्यामुळे पदनामात देखील बदल झालेला आहे. प्रादेशिक व वन्यजिव वृत्त स्तरावर सध्या मुख्य वनसंरक्षक व अपर मुख्य वनसरक्षक या दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत व अन्य कार्यात्मक पदांवर सुध्दा श्रेणीवाढ होवून पदनामात बदल झाल्यामुळे सद्य:स्थितीत वरिष्ट दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत. हे बदल लक्षात घेवून वन विभागातील कामे अधिक प्रभाविपणे पार पाडण्यासाठी वन व सामाजिक वनीकरण विभागातील अधिका-यांना नव्याने विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

वरील परिस्थितीचा विचार करुन शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र-10.08/प्र.क्र.70/2008/विनियम, दिनांक 15/5/2009 सोबत जोडलेल्या परिशिष्टांमधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 भाग पहिला उप विभाग-एक मधील अनुक्रमांक 1,2 व 3 च्या नियम क्रमांक 2 मधील नमूद अटींच्या अधीन राहून व या विभागास असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालीलप्रमाणे विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख घोषित करण्यांत येत आहेत.

1. विभाग प्रमुख .. प्रधान मुख्य वनसंरक्षक / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक व वनसंरक्षक.

2. प्रादेशिक कार्यालय प्रमुख .. उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / उप संचालक (सामाजिक वनीकरण ) व स्वतंत्र उप विभागाचे उप विभागीय वन अधिकारी / वन अभियंता

3. कार्यालय प्रमुख .. वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) / लागवड अधिकारी (सामाजिक वनीकरण)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(संजय प्रभारे)
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

मा. राज्यपालांचे
मा. मुख्यमंत्र्यांचे
मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव,
महालेखापाल-1 (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल-2 (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
सर्व मुख्य वनसंरक्षक
सर्व वनसंरक्षक
सर्व उपवनसंरक्षक
सर्व वनक्षेत्रपाल
कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (विनिमय), मंत्रालय, मुंबई-32
कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-32
वन विभागातील सर्व कार्यासने
निवड नसती, फ-5 कार्यासन, महसूल व वन विभाग, मुंबई-400 032.

Scanned by CamScanner